


# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक २६१, गुरुवार ४ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# निघोजमध्ये तलवार, कोयता, पाईप, दांडक्याने जीवघेणा हल्ला

## एकजण गंभीर जखमी । निघोजमध्ये धोंड्या जाधव गँगचा धुडगूस



आदित्य पठारे | धोंड्या जाधव | प्रथमेश उर्फ सोन्या सोनवणे | शंकर पठारे





■ निघोज येथील जत्रा हॉटेलचे मालक प्रविण भुकन यांच्यावर तलवारीने हल्ला करण्यात आल्याने ते गंभीर जखमी झाले.

**निघोज : प्रतिनिधी**

**जेवण चांगले दिले नसल्याचे कारण पुढे करून हॉटेलचालकासह त्याचा भाऊ, भाचा तसेच हॉटेलच्या दोन वेटवर तलवार, कोयता, पाईप तसेच दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना निघोज-देवीभोयरे रस्त्यावरील हॉटेल जत्रा येथे मंगळवारी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास घडली. पिंपरखेड येथील बँक लुटीतील कुख्यात आरोपी धोंड्या जाधव याच्या गँगने हा धुडगूस घातला. या घटनेमध्ये हॉटेलचालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर नगर येथील खाजगी रूग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.**

याप्रकरणी जखमी हॉटेल चालक प्रविण भुकन यांचा भाऊ गणेश भाऊ भुकन यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे की, मंगळवार दि.२ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी गणेश यांच्या ओळखीचे आदिनाथ मच्छिंद्र पठारे, विशाल खंडू पठारे व शंकर केरू पठारे हे भुकन यांच्या जत्रा हॉटेलमध्ये आले. त्यांनी जेवणाची मागणी केल्यानंतर हॉटेलच्या काउंटरवर असलेला गणेश भुकन यांचा भाचा ओकार रसाळ याने ११ वाजले असल्याने हॉटेल बंद झाले असल्याचे सांगितले.

ओंकार रसाळ याने हॉटेल बंद झाल्याचे कारण सांगितल्यानंतर आदिनाथ पठारे याने तुला जेवण द्यावेच लागेल नाहीतर मी राडा करेल असे धमकावले. वाद नको म्हणून तिथे उपस्थित असलेल्या गणेश भुकन यांनी ओंकार यास पठारे व इतरांना जेवण द्या असे सांगितले. जेवण दिल्यानंतर आदिनाथ याने जेवण व्यवस्थित नाही असे म्हणून तो मोठ मोठयाने शिविगाळ करू लागला. त्याच वेळी हॉटेलबाहेर उभे असलेले प्रविण भुकन हे हॉटेलमध्ये आले आणि शिवीगाळ करू नका, हवे तर जेवणाचे बील देऊ नका असे सांगितले. त्यावर आदिनाथसह तिघेही प्रविण यांच्या अंगावर धावून गेले. प्रविण यांना त्यांनी धक्काबुक्की केली. त्यानंतर त्यांची समजूत काढण्यात येऊन त्यांना हॉटेलबाहेर काढून देण्यात आले. जाताना आदिनाथ याने माझ्या भाईला घेऊन येतो अशी धमकी देऊन रात्री ११ वाजून ४० मिनिटांनी ते निघून गेले. त्यानंतर आदिनाथ पठारे हा धोंडया पठारे व इतरांना हॉटेलमध्ये पुन्हा आला व हॉटेलचालकासह सर्वांवर हल्ला करण्यात आला. मारहाण, तोडफोडीच्या घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्या आहेत.

### धोंडया व इतर आरोपी हत्यारांसह आले

रात्री ११ वाजून ५५ मिनिटांच्या सुमारास पुन्हा आदिनाथ पठारे, धोंडया जाधव, शंकर पठारे, विशाल पठारे, व प्रथमेश सोनवणे हे हॉटेलमध्ये आले. आदिनाथ पठारे याच्या हातामध्ये कोयता, धोंडया जाधव याच्या हातामध्ये तलवार, विशाल पठारे याच्या हातामध्ये पाईप तर शंकर पठारे याच्या हातामध्ये दांडा होता.

### धोंडयाकडून प्रविण भुकन यांच्यावर तलवारीने वार

धोंडया जाधव हा तलवार घेउन आला त्यावेळी प्रविण भुकन तिथे उभे होते. धोंडया जाधव याने प्रविण भुकन यांच्या डोक्यावर तलवारीचा वार करण्याचा प्रयत्न केला असता ते वाचविण्यासाठी प्रविण यांनी दोन्ही हात वर केले असता तलवारीचा वार दोन्ही हातावर बसून दोन्ही हातांना गंभीर दुखापत झाली. त्यानंतर प्रथमेश सोनवणे याच्या चिथावणीवरून धोंडया जाधव याने प्रविण भुकन यांच्या अंगावर तलवारीचे सपासप वार केले.

### चार-पाच दिवसांपासून रेकी

हे आरोपी गेल्या चार ते पाच दिवसांपासून जत्रा हॉटेलची रेकी करत होते अशी माहीती पुढे आली आहे. काहींच्या मते हॉटेल चालकाकडून आरोपी हप्ते वसुल करत होते. हप्ता देण्यास नकार दिल्यामुळे चिडून जाऊन हा हल्ला करण्यात आल्याची चर्चाही निघोजमध्ये दबक्या आवाजात सुरू आहे.

### मोक्कांतर्गत कारवाईकडे दुर्लक्ष

हे आरोपी सराईत आहेत. त्यांच्याविरोधात अनेक गुन्हे दाखल असून त्यांच्या विरोधात मोक्कांतर्गत कारवाई करण्याची मागणी आपण सन २०२२ मध्येच केली होती. मात्र या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यानंतर आपण मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशनही दाखल केली आहे. तरीही पोलीस प्रशासन या आरोपींना अभय देत आहे.

**बबन कवाद,** सामाजिक कार्यकर्ते

### आदिनाथ पठारेकडून कोयत्याच्या उलटया बाजूने मारहाण

आदिनाथ पठारे याने गणेश भुकन, ओंकार रसाळ, वेटर अजय व सुजान यांच्या हातावर, मानेवर, पायाच्या मांडीवर कोयत्याच्या उलटया बाजूने मारून दुखापत केली.

### विशाल, शंकर पठारेकडूनही प्रविण भुकन यांना मारहाण

विशाल पठारे याने त्याच्या हातातील पाईपने तसेच शंकर पठारे याने त्याच्या हातातील काठीने प्रविण भुकन यांना मोठ मोठयाने शिवीगाळ करीत मारहाण केली.

### हे माजले आहेत, यांना मारून टाका

धोंडया जाधव हा तलवारीने वार करीत असताना प्रथमेश सोनवणे याने हे माजले आहेत, यांना मारून टाका. यांनी चुकीच्या लोकांसोबत पंगा घेतला आहे असे धोंडया यास सांगत होता. त्यानंतर धोंडया जाधव याने प्रविण भुकन यांच्या अंगावर पुन्हा तलवारीने सपासप वार केले.

### पोलीस पाहून आरोपी पसार

पाचही आरोपींनी दहशत निर्माण केल्यामुळे हॉटेलमधून जीव वाचविण्यासाठी सर्वजण बाहेर पळाले. त्यावेळी पोलीस कर्मचारी तोडमल हे हॉटेलबाहेर आले होते. पोलीस कर्मचारी पाहून सर्व आरोपी त्यांनी आणलेली कार तसेच दोन दुचाक्यांवरून पसार झाले.

### १ लाखांचे नुकसान, प्रिंटरही लांबविला

आरोपी पसार झाल्यानंतर गणेश भुकन यांनी हॉटेलमध्ये जाऊन पाहिले असता आरोपींनी एलईडी टीव्ही, लॅपटॉप, लॅपटॉपची वायरींग, काउंटर या साहित्याची तोडफोड करीत एक लाख रूपयाचे नुकसान केले. जाताना शंकर पठारे हा हॉटेलमधील प्रिंटरही घेउन गेला.

### प्रविण भुकन यांच्यावर नगरला उपचार

प्रविण भुकन यांच्या हाताला गंभीर स्वरूपाच्या जखमा होऊन मोठया प्रमाणावर रक्तस्त्राव होत होता. गणेश व इतरांनी हात कापडाने बांधला. प्रविण यांना खाजगी वाहनातून शिरूर येथील खाजगी रूग्णालयात नेण्यात येऊन प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना नगर येथील रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

**धोंडया जाधव बँक लुटीतील आरोपी-** पारनेर तालुक्याच्या हद्दीलगत असलेल्या शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथील बँक ऑफ महाराष्ट्रची शाखा धोंडया जाधव व त्याच्या टोळीने कर्मचाऱ्यांना पिस्तुलाचा धाक दाखवून लुटली होती. काही दिवसानंतर धोंडया यास निघोजमध्येच जेरबंद करण्यात आले होते. या लुटीमध्ये रोख रक्कम व सोने असा सुमार सव्वा दोन कोटींचा ऐवज लुटण्यात आला होता. हा ऐवजीही पुणे पोलीसांना धोंडया जाधव याने निघोज शिवारातील उसाच्या फडातून काढून दिला होता.

# विजय औटीसह तिघांचे जामीन फेटाळले

## ■ नगरच्या सत्र न्यायालयाचा निर्णय ■ न्यायालयीन कोठडीतील मुक्काम वाढला



**नगर : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके यांचे सहकारी अ‍ॅड. राहुल झावरे यांच्यावर ६ जुन रोजी केलेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी सध्या न्यायालयीन कोठडीत असलेला पारनेरचा माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक विजय सदाशिव औटी याच्यासह प्रितेश पानमंद व मंगेश कावरे यांचे जामीन अर्ज नगरच्या सत्र न्यायालयाने बुधवारी फेटाळले. दरम्यान न्यायालयाच्या निर्णयामुळे विजय औटीसह इतरांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे.**

दि.६ जुन रोजी अ‍ॅड. राहुल झावरे व इतरांची किरकोळ बाचाबाची झाली होती. त्या कारणावरून मा. नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी, त्याचा भाउ माजी नगरसेवक नंदू औटी, प्रितेश पानमंद, मंगेश कावरे, अंकुश भागाजी ठुबे, नीलेश उर्फ धनू दिनकर घुमटकर, संगम सोनवणे, नामदेव लक्ष्मण औटी, पवन बाबा औटी, प्रमोद जगन्नाथ रोहोकले, प्रथमेश दत्तात्रय रोहोकले, सुरेश अशोक औटी यांनी पारनेर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात प्राणघातक हल्ला केला होता. या प्रकरणी पारनेर पोलीसांनी विजय औटी, नंदू औटी, प्रितेश पानमंद व मंगेश कावरे यांना त्याच दिवशी अटक केली होती. पुढे न्यायालयाने त्यांना अनुक्रमे पाच व तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली होती.

चारही आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाल्यानंतर त्यांनी नगरच्या सत्र न्ययालयात जामीनासाठी अर्ज दाखल केले होते. या अर्जावर मंगळवारी युक्तीवाद होऊन न्यायालयाने विजय औटी, प्रितेश पानमंद व मंगेश कावरे यांचे जामीन अर्ज फेटाळून लावले. न्यायालयीन कोठडीतील नंदू औटी याचा जामीन अर्ज सादर करण्यात आला नव्हता. दरम्यान, जामीन अर्ज फेटाळण्यात आल्याने विजय औटीसह इतरांचा कोठडीतील मुक्काम वाढला आहे.

अ‍ॅड मंगेश दिवाणे ( सरकारी वकिल ) अ‍ॅड अभिषेक भगत, अ‍ॅड अरूण बनकर, अ‍ॅड गणेश कावरे, अ‍ॅड स्नेहा झावरे, अ‍ॅड ऋषिकेश राऊत, अ‍ॅड.शुभम राजूरकर यांनी काम पाहिले.

### इतर आरोपी फरार

झावरे यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर चार आरोपींना अटक करण्यात आली असली तरी उर्वरीत आरोपी मात्र फरारच आहेत. फरार आरोपींच्या वतीने अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केल्याची माहीती असून त्यांच्या अर्जावर गुरूवारी सुनावणी होणार आहे.

### नगरपंचायतीच्या गुन्हयाची टांगती तलवार

नगरपंचायतीच्या मागणी रजिष्टरमध्ये बनावट दस्तऐवज सादर करून ३५ शॉप व २५ फलॅटची नोंद करून नगरपंचायतीची दिशाभूल व फसवणूक केल्याप्रकरणी मुख्याधिका-यांनी विजय औटी व इतरांवर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पारनेर पोलीसांना पत्र दिले आहे. हा गुन्हाही दाखल होण्याची टांगती तलवार विजय औटी याच्यावर असून तसे झाल्यास त्याच्या अडचणींमध्ये वाढ होणार आहे.

### औटी पतसंस्थांच्याही रडारवर

बनावट दस्तेवज सादर करून नगरपंचायतमध्ये नोंद केल्यानंतर औटी यांनी या कागदपत्रांच्या आधारे पतसंस्थांकरून कर्ज घेतले असून त्याच्या वासुळीसाठीही औटी पतसंस्थांच्या रडारवर आहे.

# कांदा, दूधप्रश्नावर खा. लंके यांचे शुक्रवारी आंदोलन

## जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार महाविकास आघाडीचे वादळ



**नगर : प्रतिनिधी**

**निर्यातबंदीमुळे कांद्याचे कोसळलेले भाव तसेच दुधाच्या दरात झालेल्या कपातीच्या निषेधार्थ खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी शेतकरी जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे.**

शुक्रवार दि.५ जुलै रोजी सकाळी १० वाजता या आंदोलनास सुरूवात होणार असून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

या आंदोलनासंदर्भात खा. लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना निवेदन सादर केले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, राज्यातील कांदा व दुध उत्पादक शेतकरी योग्य भाव न मिळाल्यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. दुधाचे भाव गेली वर्षभर सातत्याने कोसळत आहेत. सध्या दुधाला मिळणाऱ्या भावामध्ये दुध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही त्यातून निघत नसल्याने राज्यातील शेतकरी मेताकुटीला आलेला आहे. सरकारने दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली खरी परंतू अनुदानाच्या जाचक अटी व शर्तीमुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत नाही. नुकतीच केंद्र सरकारने दहा हजार टन दुध पावडर आयात करण्याचा उर्वरीत पान ३ वर

# मविआला बळकटी देण्यासाठी राहुल गांधी सामील होणार पंढरीच्या वारीत

## माऊली, तुकोबारायांचे आशिर्वाद घेणार



**पुणे :प्रतिनिधी**

**काँग्रेस नेतेराहुल गांधी१३ किंवा १४ जुलै रोजी पंढरीच्या वारीत काही काळ सहभागी होऊन पायी वारीचा आनंद घेणार आहे. तसंच पायी चालणं राहुल गांधी यांच्यासाठी आता नवी बाब राहिलेली नाही. कन्याकुमारी ते काश्मीर आणि मणिपूर ते मुंबई त्यांनी भारत जोडो आणि भारत जोडो न्याय यात्रा काढली होती. महाराष्ट्रातील नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या यशानंतर हे पाऊल उचलले आहे, जिथे मविआने ४८ पैकी ३१ जागा** उर्वरीत पान ३ वर










# चंदेरी

## कंगणावर इमरानची टीका...



बॉलिवूडची क्वीन कंगना राणावत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा 'इमर्जन्सी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. प्रेक्षक कंगनाच्या या चित्रपटाची आतुरतेने वाट बघत आहेत. आता अभिनेता इमरान हाश्मी याने कंगनाबद्दल भाष्य केलं आहे. कंगनाच्या वागण्यामुळेच तिला इंडस्ट्रीतून बॉयकॉट करण्यात आल्याचा खुलासा त्याने केला आहे. इमरान म्हणाला, की मला वैयक्तिकरित्या विचाराल तर एक माणूस म्हणून आणि कलाकार म्हणून कंगना फार आवडते. चित्रपटसृष्टीत कदाचित तिला काही वाईट अनुभव आले असतील. मी कंगनाबरोबर 'गँगस्टर'सारखा सुपरहीट चित्रपट दिला होता. त्यात माझी नकारात्मक भूमिका होती पण कंगना त्यात मुख्य भूमिकेत होती. त्यामुळे या इंडस्ट्रीबद्दल कंगनाचं मत नेमकं कधी बदललं, तिने सर्वांना नशेच्या अधीन असल्याचा दावा का केला किंवा घराणेशाहीविरोधात ती एवढी आक्रमक का झाली? याबद्दल मलाही ठावूक नाही. ही फार बालिश गोष्ट आहे अन् यात काहीच तथ्य नाही, असे तो म्हणाला. २०१६ पासूनच कंगनाने बॉलिवूडमधील घराणेशाहीवर भाष्य करायला सुरुवात केली, इतकंच नव्हे तर तिने प्रसिद्ध बॉलिवूड निर्माता व दिग्दर्शक करण जोहरला 'मुव्ही माफिया' म्हणूनही हिणवलं. कंगनाचे गेल्यावर्षी आलेले 'धाकड', 'चंद्रमुखी २', 'तेजस'सारखे चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आपटले. एकापाठोपाठ चित्रपट फ्लॉप झाल्यावर कंगनाच्या 'इमर्जन्सी'कडे लोकांच्या नजरा लागल्या आहेत.

## राखीशी डिव्होर्स घेऊन आदिलचा दुसरा निकाह!

राखी सावंतचा पूर्वाश्रमीचा पती आदिल खान दुर्रानी दुसऱ्यांदा लग्नबंधनात अडकला आहे. लोकप्रिय अभिनेत्री व 'बिग बॉस १२' फेम सोमी खानशी त्याने जयपूरमध्ये दुसरं लग्न केलं आहे. लग्नाचे फोटो त्याने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्याने ३ मार्च रोजी कुटुंबियांच्या उपस्थितीत सोमीशी निकाह केला.

आदिल खानने त्याच्या लग्नाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. आदिल म्हणाला, हे माझं पहिलं लग्न आहे. आम्ही सध्या बेंगळुरूमध्ये आहोत. लवकरच मुंबईला जाऊ. आमचा निकाह एका साध्या आणि सुंदर समारंभात पार पडला, हे जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. पती-पत्नी या नात्याने आमचा नवा प्रवास सुरू करण्यास आम्ही उत्सुक आहोत. सुखी वैवाहिक जीवनासाठी कृपया आमच्यासाठी प्रार्थना करा, असंही आदिलने म्हटलं आहे.

दरम्यान, आदिल खान व राखी सावंत यांनी २०२२ मध्ये लग्न केलं होतं, पण हे लग्न त्यांनी लपवून ठेवलं होतं. डिसेंबरमध्ये राखीने लग्नाचे फोटो शेअर करत इस्लाम धर्म स्वीकारून आदिलशी लग्न केल्याचा खुलासा केला होता. इतकंच नाही तर तिने तिचं नावही फातिमा ठेवलं होतं. लग्नाबद्दल माहिती सार्वजनिक केल्यानंतर आदिल व राखीची भांडणं होऊ लागली. तिने त्याच्याविरोधात मारहाण व फसवणुकीची तक्रार दिली आणि पोलिसांनी आदिलला अटक केली. त्यानंतर सहा महिन्यांनी त्याची सुटका झाली होती. तुरुंगातून बाहेर आल्यावर त्याने राखीवर गंभीर आरोप केले होते. राखीने आदिलपासून घटस्फोट घेतल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता आदिलने सोमीशी लग्न केलंय. ती जयपूरची असून आता मुंबईत राहते. 'न्याय', 'केसरिया बालम' आणि 'हमारा हिंदुस्तान' यांसारख्या अनेक टीव्ही शोमध्ये सोमीने काम केलं आहे. या जोडप्याने जयपूरमध्ये ३ मार्च रोजी निकाह केल्याचे सांगण्यात आले.



## ऋतानं सांगितलं, का घेतलं घर!



मराठीतील लोकप्रिय अभिनेत्री ऋता दुर्गुळे नेहमीच चर्चेत असते. 'फुलपाखरू' मालिकेतून ऋता घराघरांत पोहचली. अभिनयाच्या जोरावर ऋताने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. ऋताने मुंबईत स्वतःचे हक्काचे घर घेतले. एका मुलाखतीत ऋताने तिच्या नवीन घराबाबत सांगितलं आहे.

ऋता म्हणाली, मी कधीच स्वतःच्या घरात राहिलेली नाही. गेली ३० वर्षे मी आई-बाबांबरोबर भाड्याच्या घरात राहत आले आहे. आम्ही आतापर्यंत जवळपास ११ घरं बदलली आहेत. मला फार मोठं घर नको होतं. पण, मला नेहमी असं वाटायचं की, उद्या माझं लग्न झाल्यानंतर आपलं एक हक्काचं घर असावं जिथून माझ्या आई-वडिलांना कुणी काढून टाकणार नाही. मला माझ्या भावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे होते. त्यामुळे काहीही करून मला घर घ्यायचंच होतं. देवाच्या कृपेनं कोणत्याच गोष्टीत मला तडजोड करावी लागलं नाही. मी आता एखादा प्रोजेक्ट करून सहा महिने निवांत फिरू शकते. त्यामुळे मी आता माझ्या भावाला सांगते की, काहीच विचार करायची गरज नाही, असे ती म्हणाली. ऋता दुर्गुळेच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास आतापर्यंत तिने सुपरहिट मालिका व चित्रपटांमध्ये काम केले आहे. शुक्रवारी (८ मार्च) ऋताचा 'कन्नी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर शुभंकर तावडे, अजिंक्य राऊत, वल्लरी विराज व ऋषी मनोहर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ऋता दुर्गुळेने १८ मे २०२२ रोजी दिग्दर्शक प्रतीक शाहबरोबर लग्नगाठ बांधली. कुटुंबीय व मित्र परिवाराच्या उपस्थितीत हा लग्नसोहळा पार पडला. या लग्नाला मनोरंजनसृष्टीतील अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती.

## दिशाला अभिनेत्री होण्यास 'या' सेलिब्रिटीने केली मदत!



अभिनेत्री दिशा पटानी 'योद्धा' या तिच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. या ॲक्शन चित्रपटाच्या ट्रेलर लाँचचा कार्यक्रम गुरुवारी झाला. निर्माता करण जोहर, अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा, अभिनेत्री राशी खन्ना आणि दिशा पाटनी यांच्यासह 'योद्धा' च्या संपूर्ण टीमने हजेरी लावली होती. या कार्यक्रमात दिशाने, जेव्हा ती मॉडेलिंग करत होती तेव्हा करणने तिला पाहिलं आणि अभिनेत्री म्हणून काम करण्याची संधी दिली, असा खुलासा केला. दिशा पटानी म्हणाली, की मी आज अभिनेत्री आहे ती फक्त करण जोहरमुळे. कारण तोच होता ज्याने मला मॉडेलिंग करताना पाहिलं होतं आणि तेव्हा मी केवळ १८ वर्षांची होते. मला अजूनही असं वाटत जर करणने तेव्हा मला पाहिलं नसत तर मी आज या क्षेत्रात नसते. दिशाच्या या विधानानंतर, करण तिला 'आय लव्ह यू' म्हणाला. या संभाषणात सिद्धार्थनेही भाग घेतला आणि त्यानेही करणचं कौतुक केलं. असली हिरे की पेहेचान 'जोहर' को ही है, असं सिद्धार्थ म्हणाला. दरम्यान, दिशाच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'एम एस धोनी : द अनटोल्ड स्टोरी' या चित्रपटातून दिशाने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. यासाठी तिला आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमीचा (IIFA) पुरस्कारही मिळाला होता. त्यानंतर दिशा 'बागी २', 'मलंग', 'एक विलन रिटर्न्स' यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसली होती. आता 'योद्धा'या आगामी चित्रपटात दिशा झळकणार आहे. हा चित्रपट १५ मार्च २०२४ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## कतरिनाने विकीचं कौतुक केलं, क्रेडीट सासू-सासऱ्यांना

बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि अभिनेता विकी कौशल यांनी ९ डिसेंबर २०२१ रोजी लग्नगाठ बांधली. या दोघांचा शाही विवाहसोहळा राजस्थानमध्ये पार पडला होता. लग्नानंतर कतरिनाने विकीच्या संपूर्ण कुटुंबाला आपलंसं केलं. अलीकडेच एका मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या सासू-सासऱ्यांचं भरभरून कौतुक केलं आहे. कतरिना कैफने पती विकी कौशलसह तिच्या सासू-सासऱ्यांचं कौतुक केलं. ती म्हणाली, विकी विविध भूमिकांमध्ये अगदी व्यवस्थित फिट होतो. एखादी भूमिका तो ज्या पद्धतीने साकारतो ते खरंच अविश्वसनीय आहे. मी सुद्धा एक कलाकार असल्याने विकी नवनवीन काय करतोय याची नेहमीच माझ्या मनात उत्सुकता निर्माण झालेली असते. तो खरंच एक अष्टपैलू अभिनेता आहे. हे केवळ मी त्याची पत्नी आहे म्हणून बोलत नाही. तुम्ही सुद्धा त्याचा अभिनय पाहिलेला आहे, असे ती म्हणाली. विकी नुकताच 'सॅम बहादूर' चित्रपटात झळकला होता. आता लवकरच तो बहुचर्चित 'छावा' चित्रपटामध्ये झळकणार आहे. पंजाबी कुटुंबात लग्न करण्याबद्दल आणि सासू-सासऱ्यांविषयी सांगताना कतरिना म्हणाली, की लग्न म्हणजे दोन मोठी कुटुंब एकत्र येतात. आमच्या लग्नाला अनेकजण पंजाबहून आले होते. ज्यांना मी पहिल्यांदाच भेटले. त्यात आमचं कुटुंबही खूप मोठं आहे. मला एकूण सहा बहिणी आहेत. त्यामुळे आमच्या दोन्ही कुटुंबांनी लग्नात खूप मजा केली. माझ्या लग्नानंतर मला घरी भरपूर प्रेम, चमचमीत पदार्थ खायला मिळतात.

## अंबानीच्या सोहळ्यात नाचलेल्या ३ खानना किती मिळाले पैसे...

अनंत अंबानी-राधिका मर्चंट जुलै महिन्यात लग्नबंधनात अडकणार आहेत. पण त्यापूर्वी १ मार्च ते ३ मार्च दरम्यान अनंत-राधिका यांचा प्री-वेडिंग सोहळा मोठ्या थाटामाटात



पार पडला. या तीन दिवसांच्या सोहळ्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. तसंच या सोहळ्याला हॉलीवूड, बॉलीवूड, राजकीय, क्रीडा, उद्योग क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी उपस्थिती लावली होती. अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चर्चा फक्त देशातच नाही तर जगभरात होत आहे. मुकेश अंबानींनी कोणत्या सेलिब्रिटीला किती मानधन दिलं? लेकाच्या या शाही प्री-वेडिंगसाठी किती खर्च केला? याविषयी सध्या चर्चा रंगली आहे.

सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, १ मार्चला जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाचा परफॉर्मन्स झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संगीत सोहळा झाला. यामध्ये बॉलीवूडच्या सेलिब्रिटींनी जबरदस्त परफॉर्मन्स केला. तिसऱ्या दिवशी, ३ मार्चला 'टस्कर ट्रेल्स' आणि 'हस्ताक्षर' कार्यक्रम झाला. 'टस्कर ट्रेल्स' हा आउटडोअर कार्यक्रम होता. ज्याद्वारे पाहुण्यांना जामनगर, वनतारा फिरवलं. त्यानंतर रात्री भव्य महाआरती आणि अनंत-राधिका यांची हस्ताक्षर सेरेमनी पार पडली. माहितीनुसार, या संपूर्ण सोहळ्यासाठी अंबानींनी तब्बल १००० कोटींचा खर्च केल्याचं म्हटलं जात आहे. महत्त्वाची बाब म्हणजे मुकेश अंबानींनी लेकाच्या प्री-वेडिंगसाठी जी रक्कम खर्च केली आहे, ती त्यांच्या एकूण संपत्तीच्या केवळ ०.१% इतकीच आहे. त्यामुळे बॉलीवूडच्या तीन महागड्या सुपरस्टार्सना किती बरं मानधन दिलं असेल? असा प्रश्न पडलाच असेलच. शाहरुख खान, सलमान खान आणि आमिर खानने अंबानींच्या लेकाच्या प्री-वेडिंग सोहळ्यात परफॉर्म करण्यासाठी एकही रुपया न घेतल्याचं समोर आलं आहे. शाहरुख, सलमान आणि आमिरला एकत्र आणण्याचा निर्णय अचानक घेतला होता. यापैकी एकानेही परफॉर्म करण्यासाठी एक रुपया देखील घेतला नाही. बॉलीवूडच्या या तीन खानने संगीतच्या कार्यक्रमात 'नाटू नाटू' या गाण्यावर जबरदस्त डान्स केला होता. यावेळी या तीन खानबरोबर दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण देखील पाहायला मिळाला. त्यामुळे त्याने देखील परफॉर्मन्ससाठी कोट्यवधी रुपये घेतले असतील असं म्हटलं जात होतं. पण त्याने देखील अंबानींकडून एकही रुपया घेतला नाही.

### अबब... रिहानाला दिले इतके पैसे



मुकेश अंबानींनी मोठा मुलगा आकाश अंबानीच्या लग्नात जगप्रसिद्ध गायिका बियोंसेला परफॉर्मन्साठी बोलावलं होतं. त्याप्रमाणे छोट्या मुलाच्या प्री-वेडिंगमध्ये जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाला अंबानींनी १ मार्चला बोलावलं होतं. रिहानाला काही तासांच्या परफॉर्मन्ससाठी मुकेश अंबानींनी किती मानधन दिलंय माहितीये? डेली मेलच्या वृत्तानुसार, रिहानाला तब्बल ५२ कोटी रुपये दिले आहेत. याशिवाय केटरिंगवर १६५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. गेल्या वर्षी १९ जानेवारीला अनंत अंबानी व राधिका मर्चेंट यांचा मोठ्या धुमधडाक्यात साखरपुडा झाला होता.

## 'डॉन 3'साठी कियाराने घेतले १२,००,००,०००/-

कियारा अडवाणी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. आपल्या अभिनयाने कियाराने अनेकांना भूरळ पाडली आहे. आतापर्यंत तिने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता लवकरच ती फरहान खान दिग्दर्शित 'डॉन ३' चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर रणवीर सिंहची प्रमुख भूमिका आहे. आता डॉन ३ साठी कियारा अडवाणीने किती पैसै घेतले, याबाबतची माहिती समोर आली आहे...



कियारा अडवाणी मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारणार असून, सुरुवातीला या भूमिकेसाठी क्रिती सेनॉनचा विचार करण्यात आला होता. मात्र, आता कियाराच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. कियाराने या चित्रपटासाठी तब्बाल १२ कोटी रुपये फी घेतली आहे. ही फी आतापर्यंतच्या तिच्या मानधनापैकी सगळ्यात जास्त असल्याचे सांगण्यात येते. अभिनेत्रीने वॉर चित्रपटासाठी जेवढे मानधन घेतले होते त्याच्यापेक्षा दुप्पट मानधन तिने 'डॉन ३' साठी घेतले आहे. डॉन २ मध्ये शाहरुखबरोबर प्रियांका चोप्रा झळकली होती. त्यामुळे डॉन ३ मध्येही जंगली बिल्ली म्हणून प्रियांकाच दिसणार अशीही चर्चा होती. मात्र, शाहरुख व प्रियांकाने या चित्रपटातून काढता पाय घेतल्यानंतर रणवीर व कियाराच्या नावाची घोषणा करण्यात आली. डॉन ३ च्या माध्यमातून रणवीर व कियाराची जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट पुढील वर्षी म्हणजे २०२५ मध्ये प्रदर्शित होणार आहे. 'डॉन' सिरीजमधील या अगोदरचे दोन्ही चित्रपट चांगलेच गाजले होते. चित्रपटाच्या पहिल्या भागात अमिताभ बच्चन यांनी डॉनची भूमिका साकारली होती. दुसऱ्या भागात शाहरुख खान डॉन बनला होता. आता 'डॉन ३' मध्ये रणवीर कपूर व कियारा अडवाणी आपल्या अभिनयाची जादू चालवणार का हे लवकरच बघायला मिळेल.

## झील मेहता बनली बिझनेस वुमन!

तारक मेहता का उल्टा चष्मा फेम झील मेहता सध्या चर्चेत आहे. अलीकडेच तिने तिचा बॉयफ्रेंड आदित्यसोबतच्या साखरपुड्याचे फोटो पोस्ट करून चाहत्यांना आनंदाची बातमी दिली होती. शोमध्ये सोनूची व्यक्तिरेखा साकारणारी झील बऱ्याच दिवसांपासून शोपासून दूर आहे. पण सोशल मीडियावर ती लोकप्रिय आहे. आता या २८ वर्षीय तरुणीने आपल्या करिअरबद्दल एक खुलासा करून चाहत्यांना तिचा अभिमान वाटेल, अशी गोष्ट सांगितली आहे. झीलने आपण एक बिझनेस वुमन असल्याचे सांगितले...



झील मेहताबद्दल एक गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे ती म्हणजे ती एक अप्रतिम मेकअप आर्टिस्ट आहे. पण आता तिने खुलासा केला आहे की ती एक व्यवसायदेखील चालवते. शिकण्यासाठी अभिनय सोडलेल्या झीलने यापूर्वी सांगितले होते की ती मेकअप आर्टिस्ट बनली आहे. माझा सेफ स्टुडंट हाउसिंग नावाचा व्यवसाय आहे. हे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आहे. बाहेरून मुंबईत शिकण्यासाठी येणाऱ्यांना मी राहण्याची सोय करते, असे तिने सांगितले. झील मेहताने बीबीएचे शिक्षण घेतले आहे आणि आता ती फायनान्समध्ये पुढील शिक्षण घेत आहे. 'मी तारक मेहता... शो सोडला कारण मी १० वी बोर्डाची परीक्षा देणार होते. बोर्डाच्या परीक्षेची तयारी करण्याची किती गरज असते हे तुम्हाला माहीत आहे. यामुळे मी शो सोडण्याचा निर्णय घेतला. टीव्हीवर काम करावं हे माझ्या बालपणीचं स्वप्न होतं. मी माझे स्वप्न पूर्ण केले, त्यानंतर मी माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केला. आता मी व्यवसाय करत आहे आणि आता तोच चालू ठेवू इच्छितो, असेही ती म्हणाली.

### शाळेतली मैत्री आणि प्रेम

झीलने अलीकडेच बॉयफ्रेंड आदित्यसोबत साखरपुडा केला. तिने सांगितले की ते दोघेही बालपणीचे मित्र आहेत. झील आणि आदित्य यांची भेट शाळेत झाली, तर दहावीत असताना दोघांचे मैत्री पलिकडले नाते सुरू झाले. झील मेहता तारक मेहता का उल्टा चष्मा या शोमधून बाहेर पडल्यानंतर पलक सिंधवानी सोनूची भूमिका साकारत आहे. झीलच्या आधी ही भूमिका निधी भानुशालीने साकारली होती.



## शॉर्ट न्यूज

### माणसाची खरी ओळख त्याच्या कार्यातून होते

**तळेगाव दिघे :** प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी पार पाडत असताना प्रामाणिकपणा जपला पाहिजे. आपल्यावर पडलेली जबाबदारीला ओझे न मानता स्वतः ला झोकून देऊन देऊन काम केले पाहिजे. माणसाची खरी ओळख ही त्याच्या कार्यातून होत असते, असे प्रतिपादन सहाय्यक अभियंता महेश गायकवाड यांनी केले. तळेगाव दिघे येथील महाराजा लॉन्स येथे पालखेड कालवा उपविभागचे चतुर्थ कर्मचारी राधाकिसन देवराम दिघे यांच्या सेवापुर्ती सोहळ्यात ते बोलत होते.

### प्रा. उपाध्ये यांच्या कथेची अभ्यासक्रमात निवड

**श्रीरामपूर :** येथील शिरसगाव इंदिरानगर भागातील वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष प्रा. डॉ. बाबुराव दत्तात्रय उपाध्ये यांच्या कथेची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत मराठी विषयाच्या प्रथम वर्ष कला शाखा अभ्यासक्रमात निवड करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे येथील सर परशुरामभाऊ स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विषयासाठी डॉ. उपाध्ये यांच्या - आणि कमल सापडली या कथेचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

### साईबाबांच्या शिर्डीवर आता सीसीटीव्हीची नजर

**शिर्डी :** हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे देवस्थान आहे. देशभरातुन साईभक्त मोठ्या प्रमाणावर येथे येत असल्याने शिर्डी शहरात नेहमीच मोठी गर्दी असते. याच प्रमाणात अनेकदा साईभक्तांची लूट केल्याचे प्रकार घडतात. तसेच शहरात देखील वाढत्या गुन्हेगारीचा आलेख लक्षात घेता पोलिसांकडून शहरात उच्च क्षमता असलेले सीसीटीव्ही बसविण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत ८० कॅमेरे बसविण्यात आले असून अजून अनेक कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, अशी माहिती पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांनी दिली आहे.

### सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करा

**नेवासा :** शालेय जीवनात स्वयंशिस्तीचे पालन करावे. आपले वर्तन आदर्श असावे. जीवनात मोठे होण्याचे स्वप्न पहा, कठोर मेहनत व अभ्यास करत आपले स्वप्न पूर्ण करावे. आपली शैक्षणिक वाटचाल आदर्शवत असावी. तसेच सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करावा, असे आवाहन नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी केले. भेंडा येथील जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून जाधव बोलत होते.

### हिंदुत्ववादी संघटनांकडून राहुल गांधींचा निषेध

**संगमनेर :** काँग्रेसचे नेते, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हिंदू धर्माबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याच्या निषेधार्थ भाजप व हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने संगमनेर बसस्थानकासमोर घोषणाबाजी करण्यात आली, तसेच त्यांच्या प्रतिमेस शाई फासत निषेध करण्यात आला. संगमनेर येथे भाजप व हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने संगमनेर बसस्थानकावर गांधी यांच्या प्रतिमेवर काळी शाई टाकून निषेध व्यक्त केला. आंदोलनात अमोल खताळ, रोहिदास साबळे, राजेंद्र सांगळे, शशांक नामन, शैलेश फटांगरे, वरद बागूल, भगवान गिते उपस्थित होते.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राहुरीत रास्ता रोको आंदोलन

## प्रतिलिटर ४० रुपये भाव देण्याची मागणी



**राहुरी : प्रतिनिधी**

**दुधाला, ऊसाला व पिकांना योग्य भाव मिळावा यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने माजी खासदार शेतकरी नेते राजू शेट्टी व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राहुरी येथे शेतकऱ्यांसोबत रास्ता रोको आंदोलन केले. तासभर चाललेल्या या आंदोलनामुळे नगर-शिर्डी महामार्गावर दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.**

दुधाला प्रतिलिटर चाळीस रुपये भाव मिळाला पाहिजे. राज्य सरकारने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्य भर होणाऱ्या तीव्र आंदोलनास राज्य सरकार जबाबदार राहील, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी यावेळी दिला. यावेळी माजी मंत्री आमदार प्राजक्त तनपुरे, शिवसेना जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे, रवींद्र मोरे आदी उपस्थित होते. यावेळी बैलगाडी, बैलजोडी घेवून आंदोलक महामार्गावर ठाण मांडून बसले होते. जोरदार घोषणाबाजी केली गेली. डफली वाजवत, दुधाचे कॅन रस्त्यावर ओतून केंद्र व राज्य सरकारचा निषेध केला गेला.

यावेळी राजू शेट्टी म्हणाले संघर्ष संपणारा नाही. सरकार कोणाचेही असो संघर्ष करावा लागणार. उद्योगपतींना केंद्र सरकार कोट्यवधी रुपयांची कर्जमाफी देते. केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक संकटात टाकलेले आहे. कापूस, कांदा,सोयाबीन, ऊस, साखर या शेतीमालाचे बाबतीत आयात निर्यात धोरणांचा मोठा फटका उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. त्यामुळेच सरसकट पूर्ण कर्जमाफी करुन सातबारा कोरा केला पाहिजे, ही आमची मागणी आहे. सरकारी धोरणामुळे शेतकरी आज कर्जबाजारी आहे. उत्पादन खर्चापेक्षा कमी भावाने शेतीमाल विकावा लागला. दूधाला किमानचाळीस रुपये भाव मिळावा, ही माफक मागणी आहे.

आमदार प्राजक्त तनपुरे म्हणाले, राज्य सरकार गेंड्याच्या कातडीचे आहे. अनुदानासाठी सरकारच्या अटी अत्यंत जाचक आहेत. दूध उत्पादकांना लाभ मिळालाच नाही. दोन वर्षात पीकविमा नूकसान भरपाई मिळाली नाही. विविध योजनांचे लाभार्थींचे जिल्ह्यात चाळीस कोटी रुपये दीड वर्षांपासून थकीत आहेत .शेतीमालाला हमीभाव नाहीत. हे सरकार असंवेदनशील आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे, स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष रवींद्र मोरे, प्रकाश देठे, सुनील जगताप, एम. डी. सोनवणे यांची यावेळी भाषणे झाली. मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार संध्या दळवी यांनी स्वीकारले. बाबासाहेब भिटे, सुरेश निमसे, सतीश पवार, संदीप आढाव, शरद डुकरे, अविनाश पेरणे, राहुल तमनर, सचिन उंडे, जुगल गोसावी, अनिकेत कुलकर्णी, अनिल पेरणे, सचिन म्हसे, संदीप कोबरणे, अतुल वराळे, विलास वराळे, महेश उदावंत, संतोष आघाव, नितीन बाफना, गणेश कोहकडे, सतीश माने, श्रीकांत मेहेत्रे, सुरज आमटे आदी कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

# नेवाशात रंगला माऊलींच्या दिंडीचा पहिला रिंगण सोहळा

## भर पावसात ज्ञानोबा माऊली तुकारामचा गजर



**नेवासा : प्रतिनिधी**

**भर पावसात 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा गजर करीत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या नेवासे येथील दिंडीचा पहिला रिंगण सोहळा नेवासे बसस्थानक आवारात हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. माऊलींची पालखी १४ तारखेला पंढरपूरला पोहोचणार आहे. नेवासे येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर देवस्थानच्या वतीने काढण्यात येत असलेल्या दिंडीचे हे ५५ वे वर्ष आहे. यंदा वेदाचार्य देविदास महाराज म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली माऊलींच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले.**

दिंडीत नृत्य करणारे घोडे, त्या मागे पताका खांद्यावर घेत ज्ञानोबा माऊली तुकाराम जयघोष करणारे वारकरी, भजनी मंडळाचे पथक, पुष्पांनी सजविलेला पालखी रथ, त्यामागे डोक्यावर तुळशी कलश घेतलेल्या महिला भाविक असे या दिंडीचे स्वरूप होते. पांढरे शुभ्र कपडे हा गणवेश घातलेले वारकरी आणि त्यांना वाटे लावायला आलेला मोठा समुदाय भर पावसात ज्ञानबा तुकारामचा गजर करीत शहरातून चालला. त्यावेळी ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करीत फुलांची उधळण करीत स्वागत करण्यात आले. त्यामुळे नेवासे भक्तीमय झाले होते. तत्पूर्वी ''पैस' खांबाचे व चांदीच्या पादुकांचे चंदन उटी लावून पूजन करण्यात आले. पादुका डोक्यावर घेऊन मंदिराला दिंडीने प्रदक्षिणा घातली.

संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, युवा नेते उदयन गडाख, भाजपचे ऋषीकेश शेटे व विश्वस्त मंडळाने पायी दिंडी सोहळयास शुभेच्छा दिल्या. नेवासे येथील एसटी प्रांगणात १२ वाजेच्या सुमारास आगमन झाले असता, रिंगण सोहळ्याचे आयोजक, आगार व्यवस्थापक व कामगार संघटना, कर्मचाऱ्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी तहसीलदार संजय बिरादार यांनी पादुका पूजन केले.

यावेळी माऊली माऊली असा जयघोष करीत सर्वप्रथम झेंडा पथकाचे, त्यानंतर भजनी मंडळ व वारकऱ्यांसह महिलांचे रिंगण सादर करण्यात आले. अश्व नृत्य उपस्थित भाविकांचे आकर्षण ठरले. दिंडीसाठी वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस निरीक्षक धनंजय जाधव व पोलिस कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

(पान १ वरून)

### कांदा, दूधप्रश्नावर खा. लंके यांचे शुक्रवारी आंदोलन

निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे ही आयात करमुक्त असल्यामुळे दुध उत्पादकांना त्याचा मोठा फटका बसणार आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, केंद व राज्य सरकारच्या धोरणांमुळे शेती तोटयात जाऊ लागली आहे. वाढलेली महागाई, नैसर्गिक आपत्ती, खतांचे वाढलेले दर, सरकारचे शेतीमालासंदर्भातील चुकीचे धोरण, रासायनिक खते, बी-बियाणे, किटकनाशके, शेती औजारे यांच्या माध्यमातून जी. एस.टी. चा शेतकऱ्यांवर बोजा पडलेला आहे. मात्र देशभरातील जनतेला अन्नधान्य पुरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर सरकारला दिसत नाही. यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सरकारने संपूर्ण कर्जमाफीसह तात्काळ विविध उपाययोजना करणे आवष्यक आहे.

राज्यातील शेतकऱ्यांमध्ये दुध आणि शेतीमालाच्या हमी भावावरूनप प्रचंड असंतोष आहे. यासाठी अनेक शेतकरी संघटना विविध आंदोलने करीत आहेत. शेतकऱ्यांच्या दुधाला ४० रूपये दर मिळावा, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, कांदा व इतर शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा या मागणीसाठी हजारो शेतकरी, दुध उत्पादक तसेच विविध शेतकरी संघटनांसह ५ जुलै रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे खा. लंके यांच्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

### मविआला बळकटी देण्यासाठी राहुल गांधी सामील होणार पंढरीच्या वारीत

**जिंकल्या आहेत.** काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे आणि राष्ट्रवादीचे (एसपी) खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह नवनिर्वाचित मविआ खासदारांच्या शिष्टमंडळाने राहुल गांधी यांना यात्रेत सहभागी होण्याचे निमंत्रण दिले. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखीतील वारकऱ्यांसोबत काही अंतर चालत असताना राहुल गांधी माऊली आणि तुकोबांचे आशीर्वाद घेणार असल्याची पुष्टी काँग्रेसचे आमदार संजय जगताप यांनी केली. ''राहुल गांधींना पंढरीच्या वारीत सहभागी करून घेण्याच्या हालचालीकडे आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी मविआचा मतदारांपर्यंत पोहोचण्याचा उद्देश आहे. तसेच मविआ आणखी मजबूत करण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जात आहे,'' असे जगताप यांनी सांगितले. दोन वेळा महाराष्ट्रातून गेलेल्या भारत जोडो न्याय यात्रेत गांधींना राज्यातील जनतेचा चांगला प्रतिसाद मिळाला.

मात्र, राष्ट्रवादीचे अध्यक्षशरद पवारयांनी राहुल गांधींना वारीत सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे, आता त्यावरू वाद निर्माण झाला आहे. भाजपच्या अध्यात्मिक सेलचे नेते तुषार भोसले यांनी या निमंत्रणावर टीका करत पवारांच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ''सदैव हिंदूंचा द्वेष करणाऱ्या व्यक्तीला वारीत कसे बोलावले जाऊ शकते? शरद पवार यांच्या गावी गेली अनेक वर्षे वारी जात आहे, परंतु राष्ट्रवादीच्या (एसपी) नेत्याने आयुष्यात कधी वारीत हजेरी लावली नाही,'' असा भोसले यांनी आरोप लावला आहे.

भोसले पुढे म्हणाले, ''शरद पवार आणि राहुल गांधी हे आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून वारीत रस दाखवत आहेत.'' यात्रेचा एक भाग म्हणून पवार ७ जुलै रोजी काटेवाडी गावातून पालखी सोहळ्याचे स्वागत करतील. आगामी निवडणुकांपूर्वी जनतेशी संपर्क साधण्याचा आणि त्यांची स्थिती मजबूत करण्याचा राजकीय नेत्यांचा हा आणखी एक प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.

# महालक्ष्मी मल्टीस्टेटच्या ठेवीदाराची २८.१४ लाख रुपयांची फसवणूक

## संचालकांसह १६ जणांवर गुन्हा दाखल

**नगर : प्रतिनिधी**

**ठेवीवर चांगले व्याज देण्याचे आमिष दाखवून नवी मुंबई येथील महिलेची २८ लाख १४ हजार रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. स्नेहा राजेंद्र राजपाल (रा. उरण, नवी मुंबई) असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे. यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून श्री महालक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटीच्या सर्व संचालक मंडळासह १६ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

हेमा सुपेकर, अशोक गंगाधर गायकवाड, राहुल अरूण दामले, मनिषा दत्तात्रय कुटे, राजेंद्र सुखलाल पराख, अजय चंद्रकांत आकडे, मधुकर मारूतराव मुळे, प्राजक्ता प्रकाश बोरूडे, धैर्यशील जाधव, नागनाथ भिकाजी शेटे, संजय चंद्रकांत खोंडे, चंद्रकांत सुरजमल आनेचा, प्रकाश बाबुलाल बचावत, मच्छिंद्र भिकाजी खाडे, शामराव हरी कुलकर्णी, सुनील रंगनाथ वाघमारे (सर्व रा. नगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संचालक मंडळाची नावे आहेत. सदरचा प्रकार २१ मे २०१५ ते ३० एप्रिल २०२४ दरम्यान घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

स्नेहा राजपाल यांना सोसायटीच्या सर्व संचालकांनी ठेवीवर चांगले व्याज देण्याचे आमिष दाखवले. स्नेहा यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून नऊ लाख १२ हजार ८९४ रूपयांची ठेव ठेवली. स्नेहा यांनी ठेव म्हणून ठेवलेली रक्कम व त्यावरील व्याज अशी २८ लाख १४ हजार ७९ रुपयांची मागणी केली असता ठेवीची रक्कम देण्यास संचालक मंडळाने टाळाटाळ केली. फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर स्नेहा यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास सहायक निरीक्षक योगिता कोकाटे करत आहेत.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
- प्रसूती विभाग
  - प्रसूती पूर्व तपासणी
  - संपूर्ण प्रसूती उपचार
  - अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
- गर्भपिशवीचे आजार
  - अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
  - गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
  - गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
- Infertility वंधत्व उपचार
  - वारंवार होणारे गर्भपात,
  - लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
  - पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
  - टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
- स्तनांचे आजार आणि उपचार
- PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
- सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# एकोबा तुकोबा निळोबाच्या जयघोषात संत निळोबाराय पालखी सोहळ्याचे प्रस्थान

## टाळ मृदुंगाच्या गजरातील अभंग व भजनांनी श्रीक्षेत्र पिंपळनेर दुमदुमले

**पिंपळनेर : प्रतिनिधी**

**एकोबा तुकोबा निळोबाच्या जयघोषात व टाळ,मृदुंगाच्या गजरात संत परंपरेतील अखेरचे संत निळोबाराय महाराज पालखी सोहळ्याने मंगळवारी (दि.२) श्रीक्षेत्र पिंपळनेर (पारनेर) येथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले.**

प्रस्थानापूर्वी संत निळोबाराय महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते महापुजा झाली.यावेळी सनई चौघड्याच्या मंगलमय सूरांनी वातावरण भक्तिमय झाले होते.प्रस्थान सोहळ्यात सहभागी झालेल्या बाल वारकऱ्यांच्या दिंड्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

निळोबाराय देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अशोकराव सावंत, पालखी सोहळा प्रमुख,संत निळोबारायांचे वंशज ह.भ.प गोपाळबुवा महाराज मकाशिर,सुरेश पठारे, पिंपळनेरचे सरपंच देवेंद्र लंटाबळे,उपसरपंच छाया कळसकर, डॉ.श्रीकांत पठारे,डॉ.भास्कर शिरोळे, किसनराव रासकर,विजय गुगळे बाळासाहेब गाडे,संपत गाजरे, विणेकरी ह.भप मारुती रासकर, भाऊसाहेब लंटाबळे, देवस्थानचे सचिव लक्ष्मण खामकर, चांगदेव शिर्के अनिल पोटे निलेश लंटाबळे आदी उपस्थित होते.

संत निळोबारायांच्या रथाला रांधे येथील संतोष काटे यांनी खास पालखी सोहळ्यासाठी खरेदी केलेली सर्जा,राजाची देखणी बैलजोडी जुंपण्यात आली आहे.तर सिध्देश्वरवाडी व पुणेवाडी येथील दिंड्याच्या वतीने पालखी सोहळ्याला नगारा व बैलगाडी भेट देण्यात आली आहे. दरम्यान सोमवारी (दि.१) संत निळोबाराय महाराज पालखी सोहळ्याचे निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून समाधी मंदिराकडे प्रतिकात्मक प्रस्थान झाले.संत निळोबाराय महाराजांनी समाधी मंदिरात मुक्काम केला.त्यानंतर आज, मंगळवारी दुपारी तीन वाजता पालखी सोहळ्याने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले.



■ संत निळोबाराय महाराजांच्या पालखी सोहळ्याने श्रीक्षेत्र पिंपळनेर येथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले.

### तरुणाई संप्रदायाकडे हे आशादायी चित्र

**संतांचे मानवजातीवर थोर उपकार आहेत.संत विचारांमुळे, त्यांच्या शिकवणीमुळे आपली संस्कृती टिकून आहे. संतांच्या संगतीमुळे, संत विचारांच्या आचरणामुळे मानवी जीवनाचे कल्याण होते.संतांचे उपकार विसरणे हा कृतघ्नपणा ठरेल.तरुणाई मोठ्या प्रमाणावर वारकरी संप्रदायाकडे आकर्षित होत आहे हे चित्र आशादायी आहे.**

**अण्णा हजारे**
ज्येष्ठ समाजसेवक.

# कान्हूरच्या दिंडी सोहळ्यात हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन!

## वारकऱ्यांना निरोप देण्याची मुस्लिम समाजाची परंपरा कायम

**कान्हूर पठार : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील कान्हूरपठार येथील दिंडी प्रस्थान सोहळ्यात सहभागी होत मुस्लिम बांधवांनी हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडवले.कान्हूर पठार येथील मुस्लिम बांधवांनी प्रस्थान सोहळ्याच्या वेळी वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था केली.प्रस्थान सोहळ्यात सहभागी होऊन वारकऱ्यांना निरोप देण्याची मुस्लिम समाजाची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे.**

कान्हूर पठार येथील दिंडीने,संत परंपरेतील अखेरचे संत निळोबाराय महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी मंगळवारी (दि.२) पिंपळनेर कडे (पारनेर) प्रस्थान ठेवले.या प्रस्थान सोहळ्यात मुस्लिम बांधव वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन सहभागी झाले होते.

कान्हूर पठार येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर व मशिद शेजारी शेजारी आहेत.मंदिर व मशिदीची एक भिंत समाईक आहे.त्यामुळे दिंडीचे प्रस्थान ज्या पटांगणातून होते त्याच पटांगणातून मोहरमच्या ताबूतांची मिरवणूक निघते.अनेक वर्षांची ही परंपरा आहे.मात्र आपण काही वेगळ करतोय ही भावना हिंदू अथवा मुस्लिम समाजामध्ये कुठेही जाणवत नसल्याचे कान्हूरच्या ग्रामस्थांनी सांगितले.



■ प्रस्थान सोहळ्यात सहभागी झालेले मुस्लिम बांधव.

# मळगंगा ट्रस्ट सल्लागार सदस्यांचा सत्कार

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा मातेचा महिमा देशात होण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट सल्लागार कमिटीतील व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व पारनेर तालुका जैन समाज संघटनेचे पदाधिकारी सुदर्शन लोढा, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, प्रगतीशील शेतकरी मंगेश लंके यांचा सल्लागार कमिटीत समावेश झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला.**



याप्रसंगी अल्पसंख्याक सेलचे तालुका अध्यक्ष मनोहर राऊत, नाभिक समाज संघटनेचे निघोज शहराध्यक्ष नवनाथ राऊत, सामाजिक कार्यकर्ते अंकुश सोनवणे, नितीन रोकडे, प्रदिप लंके, अशोक नरवडे, अल्पसंख्याक समाजाचे नेते ठकाराम गायखे, पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज सदस्य सचिन जाधव, तसेच मित्र मंडळ वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व नवनियुक्त सल्लागार कमिटी सदस्य सुदर्शन लोढा यांनी सांगितले की मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट माध्यमातून निघोज आणि परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला या ट्रस्टवर सल्लागार कमिटीमध्ये स्थान मिळाले आहे. व्यवसायात कार्यरत राहून आपण या धार्मिक कार्यात नेहमीच सहभागी राहणार असल्याची ग्वाही लोढा व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली आहे.

# कोरोना संकटात डॉक्टरांचे महत्व अधोरेखीत

## ■ रामराव गाडेकर यांचे प्रतिपादन ■ गुरूमाऊली पोदार स्कुलमध्ये डॉक्टर दिन




**पारनेर : प्रतिनिधी**

**डॉक्टर प्रत्येकाच्या जीवनात महत्वाची भूमिका निभावतात. कोरोना महामारीच्या काळामध्ये डॉक्टरांनी दिवसरात्र काम केले आणि लाखो लोकांचे प्राण वाचविले. कोरोना काळात खऱ्या अर्थाने डॉक्टरांचे महत्व अधोरेखीत झाल्याचे गुरूमाऊली पोदार स्कुलचे अध्यक्ष रामराव गाडेकर यांनी सांगितले.**

पारनेर शहरातील गुरूमाऊली पोदार स्कुलमध्ये डॉक्टर डे साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील सर्व डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉक्टरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना निरोगी आरोग्याचा कानमंत्र दिला.

यावेळी पुढे बोलताना गाडेकर म्हणाले, १ जुलै १८८२ मध्ये भारताचे प्रसिध्द फिजीशियन डॉ. विधानचंद्र रॉय यांचा जन्म झाला. त्यांचे निधनही १ जुलै १९६२ रोजी झाले. त्यांचे वैद्यकिय क्षेत्रात अलौकीक काम केले, मोठे नाव कमवले. त्यामुळे १ जुलै हा दिवस भारतात डॉक्टर डे म्हणून साजरा करण्यात येत असल्याचे गाडेकर म्हणाले.

स्कुलचे सचिव मच्छिंद्र मते म्हणाले, समाजात डॉक्टरांची भूमिका महत्वाची आहे. ते त्यांचे जीवन रूग्णांच्या कल्याणासाठी वाहून घेतात. कोणत्याही आजारातून जलद बरे करण्यासाठी, रूग्णाच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी डॉक्टर मदत करतात. रूग्ण आणि नातेवाईकांकडून हल्ले होउनही डॉक्टरांनी कधी हार मानलेली नाही. अशा अनेक घटनानंतरही त्यांनी वैद्यकीय सेवा सुरू ठेवली. त्यांचे योगदान आणि अथक परिश्रम कोणीही विसरू शकणार नसल्याचे मते म्हणाले.

यावेळी तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ. वैरागर, डॉ. प्रमोद पितळे, डॉ. बाळासाहेब पठारे, डॉ. संदीप औटी, डॉ. विनायक सोबले, डॉ. परेश औटी, डॉ. नाईक, डॉ. अरविंद रेपाळे, डॉ. पद्मजा पठारे, डॉ. स्मिता कोल्हे, डॉ रजनी मुळे, डॉ. विद्या कावरे यांच्यासह प्राचार्य विठ्ठल तुपे, विकास दळवी, ऋषीकेश पवार आदी उपस्थित होते.

### मोबाईलचा वापर टाळा

**सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरामुळे अनेक समस्या निर्माण होत असून सोशल मीडियाच्या वापरावर बंधण असणे आवश्यक आहे. खेळाच्या मैदानाऐवजी विद्यार्थीना मोबाईलमध्ये अधिक रस असल्याचे सार्वत्रिक चित्र असून विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर टाळून अभ्यास तसेच खेळाकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे.**

**डॉ. विद्या कावरे**

# रसाळ यांनी सेवा सोसायटीमध्ये आदर्श निर्माण करावा

## मा. सरपंच सुरेश बोऱ्हुडे यांचे आवाहन

**नारायणगव्हाण : प्रतिनिधी**

**नारायणगव्हाण येथील जिल्हा बँकेचे शाखाधिकारी अर्जुन भानुदास रसाळ हे बँकेच्या सेवेतून निवृत्त झाले असून आता त्यांनी भोयरे गांगर्डा सोसायटीचे चेअरमन या नात्याने या संस्थेत आदर्श निर्माण करण्याचे आवाहन नारायणगव्हाणचे मा. सरपंच तथा जातेगांव येथील श्री भैरवनाथ देवस्थानचे विश्वस्त सुरेश बोऱ्हुडे यांनी केले.**

नाराणगव्हाण शाखेतून ३४ वर्षांच्या सेवेनंतर रसाळ हे सेवानिवृत्त झाले. या कालखंडात त्यांनी पारनेर, सुपा, वाडेगव्हाण, नारायणगव्हाण आदी शाखांमध्ये चोखपणे काम पाहिले. त्यांच्या सेवापुर्तीनिमित्त नारायणगव्हाण ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला, त्यावेळी बोऱ्हुडे हे बोलत होते.

बोऱ्हुडे म्हणाले, जिल्हा बॅकेच्या सर्वच शाखांमध्ये कार्यरत असताना रसाळ यांनी शेतकरी खातेदार तसेच ठेवीदारांची चांगली सेवा केली आहे. त्यांच्या कामाची पध्दत पाहता तसेच सहकारातील अनुभवाचा विचार करता सेवा सोसायटीमध्ये ते निश्चितच पथदर्शी काम उभे करतील यात शंका नाही. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी सोसायटीचा कारभार पाहतानाच आरोग्याचीही काळजी घेण्याचे आवाहन बोऱ्हुडे यांनी यावेळी बोलताना केले.




■ जिल्हा बँकेच्या नारायणगव्हाण शाखेचे शाखाधिकारी हे ३४ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाल्यानंतर त्यांचा सुरेश बोऱ्हुडे यांनी सन्मान केला.

### नारायणगव्हाणकरांचे प्रेम अविस्मरणीय

**जिल्हा बँकेत सेवेस प्रारंभ केल्यानंतर विविध शाखांमध्ये काम पाहिले. नारायणगव्हाण शाखेत असताना सेवा निवृत्त झालो. या कालखंडात नारायणगव्हाकरांनी दिलेले प्रेम अविस्मरणीय आहे. सहकार क्षेत्रात ३४ वर्षे सेवा केल्यानंतर आता या अनुभवाचा फायदा गावची सेवा संस्था भरभराटीस कशी येईल, शेतकरी बांधवांना जिल्हा बँकेच्या विविध योजनांचा लाभ कसा मिळवून देता येईल यासाठी मी कार्यरत राहणार आहे.**

**अर्जुन रसाळ,** सेवानिवृत्त शाखाधिकारी

यावेळी मेजर सतीश गाडेकर, अजित वाघमारे, अरूण चिपाडे, पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे नारायणगव्हाण शाखेचे शाखाधिकारी वाळुंज, सोनाली पित्तर आदी उपस्थित होते.

# बबनराव कावरे यांचे निधन; तालुक्याचे चेअरमन हरपले

**सिध्देश्वरवाडी : प्रतिनिधी**



**सिध्देश्वरवाडीचे मा. सरपंच, सेवा सोसायटीचे मा. चेअरमन बबनराव ठकाराम कावरे यांचे मंगळवारी रात्री सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास पुणे येथील खाजगी रूग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते.**

शेती व्यवसायाशी निगडीत असेलेले स्व. बबनराव कावरे हे गावाच्या राजकारणाबरोबरच तालुक्याच्या राजकारणातही अखेरपर्यंत सक्रीय होते. मा. खा. स्व. बाळासाहेब विखे यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख असलेल्या स्व. बबनराव यांनी अखेरपर्यंत विखे कुटूंबाशी असलेली आपली निष्ठा कायम ठेवली. सिध्देश्वरवाडीच्या राजकारणात, समाजकारणात ते नेहमी सक्रीय असत. त्यांनी सेवा संस्थेबरोबरच ग्रामपंचायतीचे सरपंचपदही भुषविले.

स्व. बबनराव कावरे यांनी पारनेर तालुका बाजार समितीचे दोनदा संचालक म्हणून काम पाहिले. बाजार समितीच्या सभापतीपदाच्या निवडीप्रसंगी स्व. बबनराव यांना सभापतीपदाची संधीही आली होती, मात्र घोडेबाजार तसेच राजकीय व्यूहरचनेमुळे दोन मतांनी त्यांची ही संधी हुकली. मात्र संधी हुकली तरी बबनराव यांनी आपल्या तत्वांशी कधीही तडजोड केली नाही. आपल्या राजकीय विचारांशी ते कायम एकनिष्ठ राहिले. सुक्ष्म नजर, अभ्यासू वृत्ती, चौकस दृष्टीकोन आणि सतत नव्याचा ध्यास या चतु:सुत्रीच्या माध्यमातून त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यथीत केले.

स्व. बबनराव यांच्या पश्चात पत्नी, राहूल व प्रमोद हे दोघे मुले असा परीवार आहे. त्यांच्यावर बुधवारी सकाळी ९ वाजता सिध्देश्वरवाडी येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या निधनाबद्दल अनेकांनी शोक व्यक्त केला.

### सोसायटीची ४० वर्षे सत्ता

**स्व. बबनराव कावरे यांनी सिध्देश्वरवाडी सेवा संस्थेची स्थापना केली होती. चाळीस वर्षापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या या संस्थेचे ते अनेक वर्षे चेअरमन होते. त्यामुळेच तालुक्यात त्यांना चेअरमन म्हणून ओळखले जात होते. स्थापनेपासून त्यांच्याच हाती या सोसायटीची सत्ता असून आजही त्यांचे चिरंजीव प्रमोद हे चेअरमन म्हणून काम पाहत आहेत.**

### कांदा उत्पादनात अग्रेसर

**राजकारणात सक्रीय असले तरी स्व. बबनराव हे आपल्या व्यवसायात हाडाचे शेतकरी म्हणून परीचित होते. सिध्देश्वरवाडीमध्ये कांद्याच्या पिकास अनुकूल वातावरण असून कांद्याचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या वाडीमध्ये स्व. बबनराव यांनी मोठया प्रमाणावर अनेकदा कांदा उत्पादन घेतले आहे.**

### जलसंधारणावर भर

**राजकारण करत असताना त्याचा फायदा गावासाठी व्हावा या हेतून स्व. बबनराव यांनी गावामध्ये अनेक जलसंधारणाची कामे मार्गी लावली. या कामांमुळे शेतीस उर्जीतावस्था येऊन शेतकरी बांधव समृध्द झाले.**

# शिष्यवृत्ती परीक्षेत पारनेर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची बाजी

## ■ ४६ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत ■ अनुप नांगरे राज्यात ८ वा,इशान ठुबे १४वा तर साईराज कडूस राज्यात १५ वा

**पारनेर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या ५ वी व ८वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पारनेर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. इयत्ता आठवीचे व पाचवीचे प्रत्येकी २३ असे एकूण ४६ विद्यार्थी राज्य शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत पात्र ठरले आहेत.पारनेर पब्लिक स्कूलने शिष्यवृत्ती परीक्षेतील उल्लेखनीय यशाची परंपरा कायम राखली असल्याचे विद्यालयाचे प्राचार्य गीताराम म्हस्के यांनी सांगितले.**

यशस्वी विद्यार्थ्यांचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, डांगेज पॅटर्नचे संस्थापक ज्ञानेश डांगे, विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के यांनी कौतुक केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सचिन मोढवे,शंभूनाथ भालेकर,वंदना वाघमारे,अण्णासाहेब महारनोर,सतीश काकडे,दत्तात्रय काकडे,अजिनाथ नांगरे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.



### इयत्ता ५ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेले विद्यार्थी व त्यांना मिळालेले गुण –

तेजस्विनी सुहास औटी २५४, दर्शन अण्णासाहेब महारनोर २४२,ज्ञानेश्वरी संपत शेटे २३८,अनन्या गणेश बांडे २३४, प्रज्वल तुषार पाचपुते २३२,दिग्विजय सुरेश पठारे २३२,जान्हवी विक्रम गुंड २२२, उत्कर्ष दत्तात्रय गंधाडे २२२, आयुष दिपक बेंद्रे २२२, अविष्कार मयूर सुंबरे २२०, स्वरांजली प्रदीप शिंदे २१८, आर्यन भरत वाखारे २१८, प्राजंल मंगेश ठुबे २१६, श्लोक किशोर आढाव २१४, आराध्या अविनाश चौधरी २१४, रामेश्वरी गणेश ठुबे २०४, विराज प्रकाश पिसे १९८, हिमांशु आनंदा जपकर १९८, आद्रिक भाऊसाहेब रांधवन १९६, राजवर्धन अविनाश पठारे १९६, श्रीहरी रमेश पवार १९४ यांचा समावेश आहे.

### इयत्ता ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेले विद्यार्थी व त्यांना मिळालेले गुण –

श्रावणी दत्तात्रय काकडे २४२, श्रेयश राजेंद्र गोडसे २३८, ऋषभ मधुकर देशमाने २३८, सिध्दांत विजय ठुबे २३४, तनिष्क मुकुंद ठुबे २२६, काव्या राहुल पवार २२०, अथर्व अरुण काकडे २२०, साईराज बाबासाहेब क्षीरसागर २१६, सक्षम दिपक चत्तर २१४, ध्रुव धनंजय ठुबे २१२, सोहम राहुल गांधी २१०, श्रेया योगेश पाचारणे २१०, हर्षदा श्रीकृष्ण गोंटे २१०, समृद्धी सचिन मंडलिक २१० प्रज्वल नानासाहेब मगर २०८, कृष्णा सचिन दिवटे २०६, ध्रुव बिंदकुमार नरड २०६, उत्कर्षा अजय औटी २०४, आर्यन देविदास रणदिवे २०२, कृष्णा प्रवीण गवळी २००, प्रांजल प्रदिप गाडे २००, सोहम नरेंद्र हारदे १९६.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com